RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ६२

दि. २६ जून २०२६, वार : शुक्रवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# अवैध प्रवासी वाहतुकीवर कठोर कारवाई; मालवाहू वाहनांचे परवाने रद्द होणार-मंत्री प्रताप सरनाईक


संग्रहीत छायाचित्र

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात अवैध प्रवासी वाहतुकीमुळे होणारे अपघात रोखण्यासाठी मालवाहू वाहनांतून प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून अशा वाहनांचे परवाने रद्द करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानपरिषदेत दिली.

याबाबत सदस्य सुनील शिंदे यांनी लक्षवेधी सूचना मांडली. यावेळी चर्चेत सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे, ॲड.निरंजन डावखरे यांनी सहभाग घेतला. त्यास उत्तर देताना मंत्री सरनाईक म्हणाले की, अलीकडे घडलेल्या दोन भीषण अपघातांमध्ये अनुक्रमे १३ आणि ११ जणांचा मृत्यू झाला असून दोन्ही घटनांमध्ये अवैध प्रवासी वाहतूक हेच प्रमुख कारण होते. या प्रकरणांमध्ये वाहनचालकांसह संबंधित वाहनमालकांवरही गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. संबंधित मालवाहू वाहनाचा परवानाही रद्द करण्यात आला आहे. अपघातग्रस्तांच्या कुटुंबीयांना शासनाकडून प्रत्येकी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्यात आली होती. आवश्यक कार्यवाही नंतर मदत वितरित करण्यात येणार आहे.

राज्यातील वाढती लोकसंख्या आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवरील ताण लक्षात घेऊन एसटी महामंडळासाठी ८,३०० नवीन बसेस खरेदी करण्यात आल्या आहेत. संबंधित मार्गावर तात्पुरत्या स्वरूपात प्रत्येक तासाला एसटी बस चालविण्याचे निर्देश देण्यात आले असून पुढील दोन ते तीन महिन्यांत दर अर्ध्या तासाने बससेवा उपलब्ध करून देण्याचा शासनाचा मानस असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



राज्यातील अपघातप्रवण ठिकाणांचा अभ्यास करून व्यापक रस्ता सुरक्षा आराखडा तयार करण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या सहकार्याने त्याची लवकरच अंमलबजावणी केली जाणार आहे. ग्रामीण व दुर्गम भागात प्रवाशांना अधिकृत वाहतूक सेवा उपलब्ध व्हावी यासाठी १०० मिनी बसेसही ताफ्यात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. तसेच लवकरच राज्याचे नवीन ॲग्रिगेटर धोरण जाहीर करण्यात येणार आहे. त्याद्वारे छोट्या वाहनांना कायदेशीर चौकटीत प्रवासी वाहतुकीत सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

अधिकारी बेकायदेशीररित्या प्रवासी वाहतूक कारवाईत हलगर्जीपणा करत असल्यास त्यांच्याविरुद्धही कठोर कारवाई केली जाईल. याशिवाय, ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबांना लग्नसराईसारख्या प्रसंगी माफक दरात एसटी बसेस उपलब्ध करून देण्याची अभिनव योजना राबविण्याचा विचार शासन करत असल्याचे मंत्री सरनाईक यांनी यावेळी सांगितले.

## पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचा लातूर दौरा



**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले हे शुक्रवार, २६ जून २०२६ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

पालकमंत्री श्री. भोसले यांचे २६ जून रोजी सकाळी ६.४५ वाजता लातूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल व राखीव. दुपारी १२.४५ वाजता ते लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रयाण करतील. दुपारी १ वाजता लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित जिल्हा नियोजन समिती बैठकीला ते उपस्थित राहतील. त्यानंतर सोयीनुसार मोटारीने लातूर येथून पुणेकडे प्रयाण करतील.

## सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा दौरा कार्यक्रम



**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील हे शुक्रवार, २६ जून २०२६ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

सहकार मंत्री श्री. पाटील यांचे २६ जून रोजी सकाळी ६.४५ वाजता लातूर येथे आगमन होईल व शिरूर ताजबंदकडे प्रयाण करतील. सकाळी १०.३० वाजता शिरूर ताजबंद येथील इंद्रायणी निवास येथून चाकूर तालुक्यातील वडगाव एक्कीकडे प्रयाण करतील. सकाळी ११ वाजता वडगाव एक्की येथील कै. शिवराज दिगंबर पाटील यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट देतील. सकाळी ११.१५ वाजता चाकूरकडे प्रयाण करतील. सकाळी ११.४५ वाजता चाकूर शासकीय विश्रामगृह येथे राखीव. दुपारी १२ वाजता चाकूर येथे श्री तौफिक शेख यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट देतील. दुपारी १२.१५ वाजता चाकूर येथून लातूरकडे प्रयाण करतील. दुपारी १ वाजता लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजन समिती बैठकीस उपस्थित राहतील. त्यानंतर लातूर येथून शिरूर ताजबंदकडे प्रयाण करतील. शिरूर ताजबंद येथील इंद्रायणी निवासस्थानी आगमन होईल व राखीव.

## अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी महामोर्चाच्या नियोजनासाठी विस्तारित समन्वय बैठक आज




**लातूर/प्रतिनिधी :** अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी महामोर्चा दि. ०६ जुलै २०२६ रोजी लातूर येथे आयोजित करण्यात आला असून या ऐतिहासिक महामोर्चाच्या यशस्वी नियोजनासाठी व व्यापक जनजागृतीच्या अनुषंगाने दि. २६ जून २०२६ रोजी विस्तारित समन्वय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीस सर्व आंबेडकरवादी पक्ष, संघटना, सामाजिक संस्था, विविध समाजघटकांचे पदाधिकारी, अनुसूचित जातीतील प्रतिष्ठित नागरिक, युवा, महिला, वकील, विद्यार्थी तसेच समाजहिताची जाणीव असलेल्या सर्व बांधवांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बैठकीमध्ये आगामी महामोर्चाचे नियोजन, विविध समित्यांची जबाबदारी निश्चित करणे, जनसंपर्क व प्रचार-प्रसाराची रणनीती, गावनिहाय व तालुकानिहाय सहभाग वाढविणे, शिस्तबद्ध व्यवस्थापन तसेच पुढील कृती आराखड्यावर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. ही विस्तारित समन्वय बैठक दि. २६ जून २०२६ (शुक्रवार) रोजी दुपारी १२ वाजता बुद्ध गार्डन, बोधे नगर, लातूर येथे आयोजित करण्यात आली आहे.

संविधानिक हक्कांचे संरक्षण, सामाजिक एकजूट आणि व्यापक जनसहभाग सुनिश्चित करण्यासाठी सर्व आंबेडकरवादी पक्ष, संघटना व अनुसूचित जातीतील नागरिकांनी वेळेवर उपस्थित राहून बैठकीस यशस्वी करावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## कास्ट्राईब च्या मागण्या मान्य करण्यासाठी निवेदन मागण्या मान्य करण्याचे शासनाला साकडे

- मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमधील आरक्षण तत्काळ रद्द करा
- जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा सर्व संघटनांचा आग्रह



**लातूर/प्रतिनिधी :** कर्नाटक राज्याप्रमाणे पदोन्नती मधील मागासवर्गीय आरक्षण तात्काळ लागू करावे.

महाराष्ट्रात मागासवर्गीयाच्या पदोनत्यांना अडथळा निर्माण करणारा दि.७ मे, २०२१ चा निर्णय तत्काळ प्रभावासह रद्द करावा, इतर राज्याप्रमाणे जुनी पेंशन योजना लागू करावी, सरळसेवा भरतीमधील मागासवर्गीय अनुशेष तात्काळ भरणे, राज्यात कंत्राटी नोकर भरती धोरण रद्द करावे, वाहन चालक, परिचर, शिपाई पदे कंत्राटी पध्दतीने न भरती सरळसेवा बिंदुनामावली नुसार भरावीत, दिव्यांग विभाग अंतर्गत शिक्षकेतर कर्मचा-यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ लागू करावा आणि आकृतीबंधानुसार अधिकारी/कर्मचारी यांचे पदे कमी न करता विविध कार्यान्वित योजनांच्या कामांचा आढावा घेऊन पदे वाढवून रिक्त पदे सरळसेवा भरतीद्वारे भरण्यात यावीत, अशा मागण्या शासनाकडे करण्यात आल्या.

कास्ट्राईब कर्मचारी महासंघाकडील ज्वलंत मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे राज्य अध्यक्ष कृष्णा इंगळे, कार्याध्यक्ष गणेश मडावी, वरिष्ठ उपाध्यक्ष सुमित भूईगळ यांच्या आदेशानुसार लातूर येथे जिल्हा कास्ट्राईब कर्मचारी महासंघ व महसूल कर्मचाऱ्यांच्या वतीने जिल्हाध्यक्ष नितीन बनसोडे, सरचिटणीस अशोक माळगे, जिल्हा संघटक नागरत्न कांबळे, जिल्हाध्यक्ष महसूल विभाग दत्तात्रय सूर्यवंशी, निलराज बनसोडे अध्यक्ष (जलसंपदा विभाग) यांनी निवेदन येथील अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती शिल्पा करमरकर मॅडम यांना देण्यात आले.

यावेळी सहाय्यक महसूल अधिकारी विकास अनंतवाड, राहुल बानाटे, कवळीकर शिवकांत, आडे एम. एच, विठ्ठल चव्हाण, अमोल गायकवाड, श्रीमती अनिता हुडे, श्रीमती केंद्रे राजश्री, श्रीमती कवळीकर स्वाती, श्रीमती तांदळे सीमा रवींद्र, श्रीमती सगर अनुराधा, श्रीमती स्वाती ढोणे, श्रीमंत गायकवाड यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

राज्य शासनाकडे वारंवार धरणे आंदोलने करुनही शासनाने दुर्लक्ष केले. त्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचा सूर उमटत आहे. मागण्या मान्य न झाल्यास आझाद मैदान, मुंबई येथे तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही निवेदनाद्वारे दिला आहे.

## कोकणातील आंबा-काजू उत्पादकांना १५ दिवसांत नुकसान भरपाई देणार -कृषी मंत्री



**मुंबई/प्रतिनिधी :** कोकण विभागातील अवकाळी पाऊस व हवामानातील प्रतिकूल परिस्थितीमुळे नुकसान झालेल्या आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांना राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी (एनडीआरएफ) अंतर्गत सुमारे २०९ कोटी रुपयांची, त्याचप्रमाणे हवामान आधारित पीक विमा योजनेंतर्गतची मदत १५ दिवसांच्या आत वितरित करण्यात येईल, अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

सदस्य निलेश राणे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना श्री. भरणे म्हणाले की, कोकणातील बागायतदार शेतकऱ्यांच्या नुकसानीची शासनाने गंभीर दखल घेतली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित मंत्री, लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली असून बाधित शेतकऱ्यांना त्वरित मदत देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

एनडीआरएफच्या निकषांनुसार हेक्टरी सुमारे २२ हजार ५०० रुपये मदत देण्यात येणार असून कोकण विभागातील बाधित शेतकऱ्यांसाठी २०९ कोटी रुपयांच्या मदतीचा प्रस्ताव सादर केला आहे. ही मदत लवकरात लवकर वितरित करण्यात येणार आहे. जिल्हानिहाय मदतीचा तपशील देताना ठाणे जिल्ह्यातील ४ हजार ६६९ शेतकऱ्यांना ४ कोटी ८४ लाख रुपये, पालघर जिल्ह्यातील १७ हजार ७१२ शेतकऱ्यांना ६ कोटी ८३ लाख रुपये, रायगड जिल्ह्यातील सुमारे १७ हजार शेतकऱ्यांना २० कोटी २८ लाख रुपये, रत्नागिरी जिल्ह्यातील ५२ हजार ६२८ शेतकऱ्यांसाठी ९८ कोटी ४५ लाख रुपये, तर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ४२ हजार ३२२ शेतकऱ्यांसाठी ७९ कोटी ५ लाख रुपयांची मदत प्रस्तावित करण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले.

याशिवाय हवामान आधारित पीक विमा योजनेंतर्गत आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांना सुमारे २१७ कोटी रुपयांची नुकसानभरपाई मिळणार आहे. एनडीआरएफमधील मदत तसेच पीक विमा योजनेंतर्गत मंजूर नुकसानभरपाई या दोन्ही रकमा १५ दिवसांच्या आत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यासाठी शासन आवश्यक कार्यवाही करीत असल्याचे मंत्री श्री. भरणे यांनी स्पष्ट केले.

या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य शेखर निकम यांनी सहभाग घेतला.

# शहरातील खाजगी क्लासेससह सर्व इमारतींचे तात्काळ फायर ऑडिट करा

## स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांचे अग्नीशामक विभागास निर्देश

**लातूर/प्रतिनिधी :** उत्तरप्रदेश मधील लखनऊ येथील इमारतीला आग लागुन झालेल्या दुर्घटनेत १५ निश्पाप विद्यार्थ्यांचा मृत्यू झालेला आहे. या पार्श्वभूमीवर लातूर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने तात्काळ सर्तक होऊन शहरातील खाजगी क्लासेस, महाविद्यालय, हॉस्टेल्स व्यवसायीक व रहिवाशी इमारतींचे तात्काळ फायर ऑडिट करावे असे निर्देश देऊन या सर्व इमारतीमध्ये विहीत वेळेत अग्निशमन सुरक्षा यंत्रणा बसविण्यात येण्यासाठी ठोस पाऊले उचलावित अशी सुचना स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांनी दिल्या आहेत.

माजी पालकमंत्री आमदार अमित देशमुख यांच्या सुचने नुसार स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांनी अग्निशमन विभागाची बैठक घेऊन आढावा घेतला. लातूर शिक्षणाची पंढरी असुन शहरातील विविध भागांमध्ये विद्यालय, महाविद्यालय यासह हॉस्टेलच्या अनेक इमारती आहेत. याठिकाणी शहरासह जिल्हा व परजिल्ह्यातील आणि वेगवेगळ्या राज्यातील हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

आगीसारख्या दुर्घटनेमुळे विद्यार्थ्यांना जीव गवमावा लागणार नाही याची दक्षता महानगर पालिकेच्या अग्निशमन विभागाने घेणे गरजेचे असल्याचे सभापती सचिन बंडापल्ले यांनी स्पष्ट केले. केवळ शैक्षणीक संकुलामध्ये विद्यार्थी व शिक्षक यांचेच प्राण नव्हे तर व्यावसायिक व रहिवाशी इमारतीतील नागरिकांचे प्राण ही तितकेच मोलाचे असल्याचे सभापती बंडापल्ले यांनी निदर्शनास आणून दिले.

सभापती सचिन बंडापल्ले यांनी अग्निशमन विभागाला स्पष्ट निर्देश देताना सांगितले की, या सर्व इमारतीचे तात्काळ फायर ऑडिट होणे आवश्यक आहे. याकरीता अग्निशमन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी लगेचच हि मोहीम हाती घ्यावी. ज्या इमारती मध्ये अग्निशामक सुरक्षा यंत्रणा योग्य आहे त्या इमारतींना प्रमाणपत्र देण्यात यावे आणि ज्या इमारतींमध्ये ही यंत्रणा नादूरुस्त अथवा उपलब्ध नाही त्यांना ठराविक मुदत देऊन नोटीस देण्यात यावी अशी सुचना केली.

केवळ एवढ्यावरच न थांबता ठराविक मुदत संपल्या नंतर पुन्हा त्या इमारतींचे ऑडिट करुन आग्निशामक सुरक्षा यंत्रणा सक्षम आहेत का नाही याची शहानिशा करावी असे सांगुन या सर्व बाबींचा आढावा आगामी काही दिवसात देण्यात यावा असे निर्देश स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांनी दिले आहेत. त्याच बरोबर आगीच्या दुर्घटनेतून कशा पध्दतीने बचाव करावा याबाबतची जनजागृती ही विभागाच्या वतीने करण्यात यावी अशी सुचना दिली आहे.यावेळी अग्नीशामक सुरक्षा प्रमुख गणेश चौधरी, बापूसाहेब जाधव यांच्यासह विभागातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



संपादकीय...

## लोककल्याणकारी, प्रजावत्सल राजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज

सामाजिक क्रांतीचे अग्रदूत, थोर समाजसुधारक, लोककल्याणकारी राजे, पुरोगामी चळवळीचे पुरस्कर्ते, आरक्षणाचे जनक राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची आज जयंती. त्यानिमित्त... रयतेचे कल्याण हेच आपल्या कारभाराचे मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे ही शिवछत्रपतींची भावना मनोमनी जागृत ठेवून आपल्याला मिळालेला राज्याधिकार हा राजवैभव व राजविलास यांचा उपभोग घेण्यासाठी नसून तो आपल्या गरीब व अज्ञानी जनतेच्या उद्धारासाठी आहे ही लोककल्याणकारी, प्रजावत्सल राजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची अंतरीची तळमळ होती. राज्यारोहणानंतर एक ते दीड वर्षातच शाहू महाराजांना दोन भयंकर संकटांना सामोरे जावे लागले. पहिले म्हणजे दुष्काळ आणि दुसरे प्लेगची साथ. तिथे त्यांच्या प्रशासन कौशल्याची कसोटी लागली. भास्करराव जाधवांसारख्या एकनिष्ठ व कर्तबगार अधिकाऱ्याच्या सहकार्याने, अथक परिश्रमाने १८९६-९७ व १८९९-१९०० दोन्ही दुष्काळांत निराधार आश्रम आणि पाळणाघरांची उभारणी करून ५० हजार निराधार लोकांना जीवनदान देण्याचे मानवतावादी समाजकार्य शाहू राजांनी केले. खामगाव येथील अखिल भारतीय शिक्षण परिषदेच्या अकराव्या अधिवेशनात अध्यक्षपदावरून बोलताना शाहू महाराज म्हणाले, 'शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही. अज्ञानाने बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी वीर कधीही निपजणार नाहीत म्हणून सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानाला अत्यंत आवश्यकता आहे.' २५ जुलै १९१७ रोजी शाहू राजांनी मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा आदेश जारी केला. ग्रामीण भागातील मुलांना प्राथमिक शिक्षणानंतर, माध्यमिक व उच्च शिक्षणाची सोय होण्यासाठी त्यांनी निरनिराळ्या जातींची वसतिगृहे काढली. जे पालक मुलांना शाळेत पाठवणार नाहीत त्यांना एक रुपया दंड ठोठावला. धार्मिक कार्याच्या शिक्षणासाठी सत्यशोधक व वैदिक पाठशाळेपासून कार्यालयीन कामकाजाच्या पद्धतीचे शिक्षण देणार्या पाठशाळांपर्यंत आणि लष्करी शाळेपासून तांत्रिक शिक्षण देणाऱ्या इन्स्टिट्यूटपर्यंतच्या शैक्षणिक क्रांतीच्या विकास वाटा जनसामान्यांसाठी खुल्या करण्याचे अमूल्य कार्य शाहू महाराजांनी केले. कोल्हापूरला 'मदर ऑफ बोर्डिंग हाऊसेस,' असे संबोधले जाते. या वसतिगृह चळवळीतून हजारो मुले गेल्या १०० वर्षांत शिकून पुढे आली. शाहू महाराजांनी संस्थानाबाहेर नाशिक, नागपूर येथील अस्पृश्यांच्या अनेक वसतिगृहांनाही अर्थसाहाय्य केले. शाहू महाराजांनी जातिभेद निर्मूलनाकरिता ठोस भूमिका घेतली. एक संस्थानिक मागासवर्गीयांच्या उन्नतीकरिता राजगादीचा नि:संकोचपणे त्याग करण्याची तयारी ठेवतो, तो संस्थानिक रुढार्थाने राजा नसतो. तो असतो 'माणसातील राजा व राजातील माणूस.' जातीच्या नावाखाली भरणाऱ्या जात परिषदेतून जाती भक्कम होण्याचा धोका या दूरदृष्टीच्या राजाने वेळीच ओळखला होता म्हणून जातीच्या पुढार्यांना 'आपली दृष्टी दूरवर ठेवा, पायापुरते पाहू नका,' असे त्यांनी जाहीरपणे सांगितले. महाराजांनी भारताची राज्यघटना अस्तित्वात येण्यापूर्वी ४८ वर्षे आणि आजपासून १२३ वर्षांपूर्वी २६ जुलै १९०२ रोजी आपल्या संस्थानात ५० टक्के राखीव जागा ठेवल्या होत्या. भारतातील राखीव जागा ठेवणारा हा बहुदा पहिलाच कायदा असावा. विसाव्या शतकातील एक संस्थानिक भारतीय समाजातील मानवनिर्मित विषमता दूर करण्यासाठी आपला देह झिजवतो, हे अपवादात्मक उदाहरण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखे 'राष्ट्रीय नेतृत्व' उभे करण्यात शाहू महाराजांनी केलेली सुरुवातीची पायाभरणी निश्चितच मोलाची आहे. कोणताही सामाजिक बदल केवळ प्रबोधन करून पूर्णत्वास जात नाही, तर त्याला कायद्याची जोड लागते. याकरिता अस्पृश्यता निर्मूलनासाठी सर्व पातळीवर हुकूम, आदेश, कायदे, जाहीरनामे काढत व त्यांची काटेकोर अंमलबजावणी करण्याची राजकीय इच्छाशक्ती दाखवली. 'समतेचे शहर' ही कोल्हापूरची ओळख फक्त शाहू महाराजांच्या सामाजिक आणि राजकीय कार्यातून निर्माण झाली. शाहू महाराजांनी आपल्या हयातभर, जातिभेद व अस्पृश्यता या दोन्ही सामाजिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. अस्पृश्यता हे जातिभेदाचेच विकृत स्वरूप असल्याचे त्यांनी अनेकदा जाहीर केले होते. अस्पृश्यांच्या मुलांचे उपनयन करून त्यांना 'वेदाची संथा' देणारा आणि त्यांना ब्राह्मणांच्या तथाकथित श्रेष्ठ दर्जावर आणून ठेवणारे शाहू राजे हे हिंदुस्थानच्या इतिहासातले पहिले राजे होय. पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या हजेरी आणि वेठवरळा या अमानुष सामाजिक गुलामगिरीच्या शृंखलेतून पददलितांना मुक्त करण्याचे कार्य राजांनी केले. महाराजांच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्याविषयी धनंजय कीर म्हणतात, 'शाहूंच्या या अलौकिक प्रेमामुळे व निष्ठेमुळे त्यांना मागासवर्गीय व पददलित देवासमान मानत होते. गौतम बुद्ध, महात्मा फुले व आंबेडकर यांना ते जसे पूजनीय मानीत तसेच शाहू राजांना ते आपला उद्धारकर्ता म्हणून पूजनीय मानीत!' 'वेदोक्त' प्रकरण जेव्हा कोल्हापूर संस्थानात धुमसत होते, त्यावेळी अहंकारी पुरोहितशाहीच्या विळख्यातून आपल्या जातीस सोडवण्याचे विचार महाराजांच्या मनात उत्पन्न होत होते. दैवज्ञ सोनार, शेणवी, लिंगायत जैन या जातीच्या लोकांनी ब्राह्मणी पुरोहितशाहीचे जोखड फेकून देऊन स्वतः चे धर्मगुरू निर्माण केले. तसे मराठ्यांनीही का करू नये, असा विचार त्यांनी एका पत्रात व्यक्त केला आहे. वर्णवर्चस्वाविरुद्ध महाराजांचा जो सतत संघर्ष चालू होता, त्यामध्ये छात्रजगद्गुरुपदाची निर्मिती हा एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा होता. त्यांची ही कृती म्हणजे महाराष्ट्रातील पुरोहितशाहीला दिलेला जबरदस्त धक्का होता. सत्यशोधक पुढारी व शाहू चरित्रकार अण्णासाहेब लठ्ठे, थोर साहित्यिक वि. द. घाटे व प्रसिद्ध इतिहास संशोधक प्रा. न. र. फाटक यांनी शाहू महाराजांच्या या कार्याची, युरोपातील प्रोटेस्टंट बंडखोर सुधारकांच्या कार्याशी तुलना करून त्यांच्या या धाडसी कार्याचा गौरव केला आहे. १९०२ मध्ये महाराजांनी आपल्या संस्थानासाठी अपूर्व असे 'सार्वत्रिक पाटबंधारे धोरण' जाहीर केले. त्यासाठी लवकरच स्वतंत्र पाटबंधारे खाते निर्माण करून त्यावर इरिगेशन ऑफिसरची नेमणूक करण्यात आली. वारंवार पडणाऱ्या दुष्काळासारख्या संकटावर कायमची मात करण्याची पायाभूत योजना त्यांनी तयार केली. भोगावती नदीचा जलप्रवाह अडविणाऱ्या धरणाची महत्त्वाकांक्षी योजना; जी पुढे कोल्हापूर जिल्ह्याची वरदायिनी ठरली आणि या योजनेतूनच कोल्हापूर संस्थानात हरितक्रांतीचा प्रारंभ झाला. १९१२ मध्ये कोल्हापुरात 'किंग एडवर्ड ग्रीकल्चरल इन्स्टिट्यूट' ही स्वतंत्र शेती संस्था स्थापन केली. सुधारित अवजारांचे एक म्युझियम उघडले. महाराजांच्या कारकिर्दीत शेती व जनावरांची प्रदर्शने भरत. आदर्श शेतीचे प्रयोग करून दाखवले जात. स्वातंत्र्यानंतर उपयुक्त ठरलेल्या सर्व प्रयोगांची बीजे शाहू महाराजांच्या कारकिर्दीत आढळतात. सहकार तत्त्वाचा पुरस्कार करत अनेक उद्योगधंद्यांना चालना दिली. आज सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या विविध उद्योग-व्यवसायांमुळे कोल्हापूर जिल्हा शेती, दूध क्षेत्रात महाराष्ट्रात अग्रेसर आहे. उद्योगांसाठी प्रशिक्षित कामगार तयार व्हावेत म्हणून राजाराम इंडस्ट्रियल स्कूल स्थापन करण्यात आले. लहान-मोठ्या व्यापाऱ्यांना व उद्योजकांना काही प्रसंगी अल्पमुदतीची कर्जे सरकारकडून देण्याची व्यवस्था त्यावेळी केली तसेच संस्थानाबाहेरच्या उद्योजकांनाही महाराजांनी त्यांचा व्यवसाय वाढवण्यासाठी सहकार्य केल्याची उदाहरणे सापडतात.

# राजर्षी शाहू महाराज : समतेच्या क्रांतीचा अजिंक्य दीपस्तंभ



आज राजर्षी शाहू महाराजांची जयंती साजरी करताना आपण केवळ एका संस्थानिक राजाची आठवण काढत नाही, तर भारतीय समाजव्यवस्थेच्या काळोख्या गर्तेत समतेचा दीप प्रज्वलित करणाऱ्या एका युगपुरुषाला अभिवादन करतो. इतिहासात अनेक राजे झाले, अनेकांनी सत्ता गाजवली, युद्धे जिंकली आणि वैभवशाली राजवाडे उभे केले. परंतु ज्याने आपल्या सत्तेचा उपयोग समाजातील शेवटच्या माणसाच्या उन्नतीसाठी केला, त्याचे नाव काळाच्या पलीकडे जाऊन अमर होते. राजर्षी शाहू महाराज हे असेच एक अमर व्यक्तिमत्त्व होते. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस आणि विसाव्या शतकाच्या प्रारंभी भारतातील सामाजिक परिस्थिती अत्यंत विषम होती. जात, धर्म, वर्ण आणि जन्माच्या आधारावर माणसाचे स्थान ठरवले जात होते. शिक्षण, नोकऱ्या, सामाजिक प्रतिष्ठा आणि सत्तेची दारे काही विशिष्ट वर्गापुरती मर्यादित होती. बहुजन, शोषित, वंचित आणि अस्पृश्य समाजाला माणूस म्हणून जगण्याचाही अधिकार नाकारला जात होता. अशा काळात कोल्हापूरच्या गादीवर बसलेला एक राजा समाजाच्या वेदना समजून घेतो आणि त्या वेदना दूर करण्यासाठी संघर्षाचा मार्ग स्वीकारतो, ही घटना केवळ ऐतिहासिक नाही तर क्रांतिकारी होती.

राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन मानले. त्यांनी बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरू केली, शिष्यवृत्ती दिल्या आणि शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली. त्या काळात शिक्षण हे काही मोजक्या लोकांचे मक्तेदारीचे क्षेत्र मानले जात होते. परंतु शाहू महाराजांनी शिक्षणाला सामाजिक न्यायाचे शस्त्र बनवले. आज आपण शिक्षणाच्या हक्काबद्दल सहज बोलतो, पण त्याची बीजे शाहू महाराजांसारख्या दूरदर्शी नेत्यांनी पेरली होती. सामाजिक न्यायाच्या इतिहासात शाहू महाराजांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे आरक्षणाची संकल्पना प्रत्यक्षात आणणे होय. १९०२ मध्ये त्यांनी मागासवर्गीयांसाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये ५० टक्के आरक्षण लागू केले. आज आरक्षणावर अनेक चर्चा होतात, अनेक वादविवाद रंगतात; पण हे लक्षात घेतले पाहिजे की आरक्षण ही दया किंवा सवलत नसून ऐतिहासिक अन्यायाची भरपाई करण्याची सामाजिक व्यवस्था आहे. ही भूमिका सर्वप्रथम स्पष्टपणे मांडण्याचे धाडस शाहू महाराजांनी दाखवले.

शाहू महाराजांचा संघर्ष केवळ प्रशासनापुरता मर्यादित नव्हता. त्यांनी अस्पृश्यता, जातीय भेदभाव आणि सामाजिक विषमतेविरुद्ध उघडपणे आवाज उठवला. मंदिरे, विहिरी, सार्वजनिक ठिकाणे आणि सामाजिक संसाधने सर्वांसाठी खुली व्हावीत यासाठी त्यांनी प्रयत्न केले. समाजातील उच्च-नीचतेच्या भिंती पाडण्याचा त्यांनी सातत्याने प्रयत्न केला. त्यांना माहित होते की कायदे बदलणे सोपे आहे, पण मनातील भिंती पाडणे कठीण आहे. म्हणूनच त्यांनी सामाजिक प्रबोधनाला तितकेच महत्त्व दिले. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सत्यशोधक विचारसरणीचा शाहू महाराजांवर मोठा प्रभाव होता. त्यांनी फुले यांच्या कार्याला राजाश्रय दिला आणि बहुजन मुक्तीच्या चळवळीला बळ दिले. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाची क्षमता ओळखून त्यांनाही पाठबळ दिले. इतिहासात अशा व्यक्तिमत्त्वांचे महत्त्व यासाठी मोठे असते की ते केवळ स्वतः काम करत नाहीत, तर परिवर्तन घडवणाऱ्या नव्या नेतृत्वालाही घडवतात.

आजच्या भारताकडे पाहताना शाहू महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे वाटतात. विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण आणि अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रात देशाने मोठी प्रगती केली आहे. परंतु सामाजिक समतेचे स्वप्न अजूनही पूर्ण झालेले नाही. जातीय भेदभावाच्या घटना आजही घडतात. शिक्षण आणि रोजगाराच्या संधींमध्ये विषमता दिसते. आर्थिक विकासाच्या शर्यतीत समाजातील मोठा घटक अजूनही मागे राहिलेला आहे. अशा वेळी शाहू महाराजांची आठवण केवळ जयंतीपुरती मर्यादित राहू नये. दुर्दैवाने आज अनेकदा महापुरुषांचे विचार बाजूला ठेवून त्यांच्या नावांचा राजकीय वापर केला जातो. जयंती, पुण्यतिथी, मिरवणुका आणि घोषणांमध्ये महापुरुषांचा गौरव केला जातो, परंतु त्यांच्या विचारांची अंमलबजावणी करण्याची प्रामाणिक इच्छा कमी दिसते. शाहू महाराजांचा खरा सन्मान त्यांच्या पुतळ्यांना हार घालण्यात नाही, तर त्यांनी मांडलेल्या समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या मूल्यांना व्यवहारात उतरवण्यात आहे. आज शिक्षणाचे व्यापारीकरण वाढत आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जात आहे. बेरोजगारीची समस्या गंभीर होत आहे. सामाजिक ध्रुवीकरण वाढत आहे. अशा परिस्थितीत शाहू महाराजांचा दृष्टिकोन मार्गदर्शक ठरतो. समाजातील दुर्बल घटकांना संधी दिल्याशिवाय कोणताही विकास सर्वसमावेशक होऊ शकत नाही, हा त्यांचा संदेश आजही तितकाच लागू आहे. शाहू महाराजांनी आपल्याला एक मूलभूत तत्त्व शिकवले, राज्यकारभाराचा केंद्रबिंदू सत्ताधारी नसून सामान्य माणूस असला पाहिजे. शासनाचे यश हे राजवाड्यांच्या वैभवात नसते, तर शेवटच्या घटकाच्या जीवनात झालेल्या सकारात्मक बदलात असते. हा विचार लोकशाहीच्या युगात अधिक महत्त्वाचा ठरतो. कारण लोकशाही केवळ निवडणुकांपुरती मर्यादित नसून ती सामाजिक आणि आर्थिक न्यायाची सततची प्रक्रिया आहे. राजर्षी शाहू महाराजांचे जीवन हे आपल्याला सांगते की परिवर्तनासाठी सत्ता असणे पुरेसे नाही तर त्या सत्तेमागे सामाजिक बांधिलकी आणि नैतिक धैर्यही आवश्यक असते. त्यांनी समाजाच्या रोषाची पर्वा न करता योग्य ते करण्याचे धाडस दाखवले. म्हणूनच ते केवळ कोल्हापूरचे राजे राहिले नाहीत, तर सामाजिक न्यायाचे राजर्षी बनले.

आज त्यांच्या जयंतीनिमित्त आपण स्वतः ला एक प्रश्न विचारला पाहिजे की, समतेचे, शिक्षणाचे आणि सामाजिक न्यायाचे जे स्वप्न शाहू महाराजांनी पाहिले, त्या स्वप्नाच्या पूर्ततेसाठी आपण कितपत योगदान देत आहोत? हा प्रश्न केवळ शासनाला नाही, तर समाजातील प्रत्येक नागरिकाला आहे. राजर्षी शाहू महाराज हे इतिहासातील एक प्रकरण नाहीत तर ते वर्तमानाला दिशा देणारी आणि भविष्य उजळवणारी प्रेरणा आहेत. जोपर्यंत समाजात विषमता आहे, अन्याय आहे आणि वंचितांचा संघर्ष सुरू आहे, तोपर्यंत शाहू महाराजांचे विचार जिवंत राहतील. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करताना एवढेच म्हणावेसे वाटते की, समतेचा हा दीप कधीही विझू नये कारण त्या प्रकाशातच भारताच्या खऱ्या लोकशाहीचे आणि मानवतेचे भविष्य दडलेले आहे.


समता, सामाजिक न्याय, शिक्षणाचा प्रसार आणि बहुजन कल्याण यांसाठी आयुष्य वेचणारे राजर्षी शाहू महाराज हे आधुनिक भारताच्या सामाजिक परिवर्तनाचे महान शिल्पकार होते. त्यांच्या विचारांचा प्रकाश आजही समाजाला समानता, बंधुता आणि मानवतेची दिशा देत आहे. या जयंतीनिमित्त आपण जात, धर्म, पंथ आणि विषमतेच्या भिंती ओलांडून समतामूलक, न्याय्य आणि प्रगतिशील समाज निर्माण करण्याचा संकल्प करूया. शाहू महाराजांनी दाखविलेल्या शिक्षण, सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशक विकासाच्या मार्गावर चालणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. राजर्षी शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा!

समता, शिक्षण आणि सामाजिक न्यायाचा विचार प्रत्येक घरापर्यंत पोहोचू दे, हीच राजर्षींना विनम्र अभिवादन!



**प्रविण बागडे**
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# बुद्धभूमी जमिनीचा वाद मिटवणार कोण....???





बुद्धभूमीचा तिढा वाढत चालला आहे. ज्यांना या जमिनीबद्दल काडीची माहिती नाही ते लोक वादग्रस्त वक्तव्य करून हा वाद सुटूच नये असा प्रयत्न तर करीत नाहीत ना..... असा संशय येतो. दिवंगत दिगंबर कांबळे यांनी प्रथम ही जमीन सांभाळली त्यात अनेक सातबारा होते.सदरच्या जागेवर सन १९९४ साली शासनातर्फे नियुक्त केलेल्या संचालक,नगररचना ( आयु. थुल साहेब) यांनी शहर विकास योजना तयार केली.या डी.पी. नुसार वेगवेगळ्या प्रयोजनासाठी विविध आरक्षणे या जागेवर टाकण्यात आली होती.तसेच या जागेतून काटेमानिवली ते रोशन पेट्रोल पंप पर्यंत ब्रिज दर्शवण्यात आला होता. सदरचा डीपी प्लान हरकती नोंदवण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आला होता मात्र त्यावेळेस कोणीही त्याला हरकत नोंदवलेली नाही.

त्यामुळे शासनाने सदरचा डीपी नकाशा मंजूर केला.सन २००९-२०१२ च्या दरम्यान ताकतवार व राजकिय लागेबांधे असलेल्या लोकांनी सदरची आरक्षित जागा महापालिकेकडे हस्तांतरीत करुन या जागेचा टी.डी. आर.घेतला.या इतिहासात घुसण्याची फार आवश्यकता नाही.आज भन्ते गौतम रत्न यांच्या ताब्यात फक्त ही जमीन आहे.कायद्याच्या भाषेत कब्जेदार. त्या व्यतिरिक्त काही नाही.सर्व जमीन खाजगी सात बारा असलेल्या लोकांचा टि डी आर घेतल्याने सर्व जमीन कल्याण डोंबिवली महापालिकेच्या नावावर असल्याने आता सरकारी जागा झालेली आहे.ही चांगली गोष्ट झाली आहे.

त्यामुळे मंत्रालय लेव्हल वर पाठपुरावा करून जमीन मिळवता येऊ शकते.त्यासाठी मंत्री संत्री सर्व सरकारी यंत्रणा यांच्याशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करूनच या संपूर्ण जमिनीवर सरकारच्या मदतीने त्यांच्याच पैशाने भव्य दिव्य योजना आखून करून घ्यावे लागेल.

या जागेवर उड्डाणं पूल करण्यासाठी १९९४ सालीच प्लयान तयार केलेला होता. आणि आता त्याचे काम सुरु झालेले आहे. जेव्हा पहिला खांब (पिल्लर) उभा राहिला तेंव्हा भन्ते गौतम रत्न भन्ते यांनी विरोध केला पाहिजे होता. किंवा त्या अगोदरच एम एम आर डी यांनी नकाशा तयार केला तेंव्हा त्याचा आराखडा (प्लयान) बदलून नदी किनाऱ्यावरून घेण्यासाठी आंदोलन केले पाहिजे होते.तशी जागृती समाजात केली पाहिजे होती.जशी आपण आज करीत आहोत.आता साप निघून गेल्यावर काही उपयोग होणार असे वाटत नाही.

सातबारा आणि कोणाला टीडिअर दिला त्याची चौकशी करण्याची मागणी केली तर विषय भलती कडेच जाईल. कारण टी डि आर घेणारे लोक निघून गेले आणि ते लोक राजकीय सत्ताधारी लोकांशी संबंधित आहे. यांच्या चौकशीत ही जागा विकसित करण्याचे लांबनीवर जाईल.आणि या जागेवर जे अपेक्षित आहे ते कधीच पूर्ण होण्याची शक्यता कमीच आहे.

सत्ताधारी लोक मजबूत आहेत. त्यांनी सत्ता खेचून मिळवलेली आहे. केंद्रात आणि महाराष्ट्रात दोन्ही ठिकाणी मजबूत सरकार आहे. बौद्ध गयाचे आंदोलन ते दाबु शकतात. (जे बौद्ध गया हेरिटेज. इंटरनँशनल आहे.) आपल्या कडे आहे काय...? भन्ते गौतम रत्न आणि त्यांचे अंगावर असलेले चिवर..... या जोरावर आंदोलन यशस्वी होईल असे वाटत नाही. कारण कागदोपत्री आपण कमकुवत आहोत.आणि त्यात आपलेच आपल्या विरोधात.... आंदोलनाचा जनाधार किती दिवस मिळणार..?

भन्ते गौतम रत्न यांना माझी विनंती आहे.सरकारी यंत्रणा तुमच्या मताशी सहमत आहेत.हर्षदीप कांबळे सर आपल्याला मदत करीत आहेत. निधी सर्व कामासाठी मिळत आहे. तर दोन पावले मागे येऊन सरकारला सहकार्य करा.जर ते तुम्हाला प्राधिकरणात बरोबर घेऊन बुद्ध भूमी सरकारी जमिनीवर विकास करून देत आहेत तर त्यांना सहकार्य करून लोकांसाठी हे भव्य स्मारक होऊ द्या. यात विजय तुमचाच आहे.संघर्ष करण्याचे दिवस आता राहिलेले नाहीत.हे समजून घ्या.

तुमची आणि लोकांची शक्ती वाया घालवू नका.आता मी असे लिहील्यावर माझ्यावर सर्व स्तरातून टीका होणार याची मला खात्री आहे. आपलेच लोक विषारी टिका करतील.याची मला कल्पना आहे. कारण.... में.अशोका बिल्डकॉन याच्याशी रुक्मिणीबाई हॉस्पीटलच्या जागेवर मल्टीफ्लेक्स थियेटर आणि मॉल बांधकाम विरोधात जेंव्हा मी एकट्याने संघर्ष केला तेंव्हा आपले लोक माझी थट्टा करत होते.पण मी संघर्ष केला आणि त्या कामावर स्टे मिळवला.

त्याचे काम थांबवले.त्या वेळी उच्च पदस्थ व्यक्तीला मध्ये टाकून मला मोठी ऑफर दिली ती ऑफर बरोबर घेऊन पण आले होते.पण ज्या हॉस्पिटल मध्ये माझा माझ्या भावाचा माझ्या बहिणीचा जन्म झाला.ते हॉस्पीटल उध्वस्त होतांना पाहून मला प्रचंड चीड आली होती. मी त्या अशोका बिल्डकॉन याची ऑफर धुडकावून लावली.मी ती स्वीकारली असती तर आज तेथे मॉल उभा झाला असता.आणि मी मालामाल झालो असतो.

ती जागा वाचवली म्हणून मी डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यानाची जागा वाढवू शकलो. आज त्या जागेवर भलतेच लोक दावा सांगतात... डॉ.बाबासाहेब उद्यान जेंव्हा माझ्या वडिलांनी बनवले तेंव्हा ज्यांचा उदय ही झाला नव्हता. ते म्हणतात मी उद्यान बनवले...असो.

माझी भन्ते गौतम रत्न यांना विनंती आहे.आपली बाजू कमजोर आहे. आपला फक्त ताबा आहे.आणि जागेचा सरकारने तपास केला तर आपल्या हाती काही लागणार नाही.समंजस पणा घ्या.भगवान गौतम बुद्धाना राजे लोक पाहिजे तेव्हडी जमीन द्यायला तयार होते.पण ते आयुष्यभर धम्म प्रचार करीत फिरत राहिले.लोकांच्या मध्ये राहिले त्यांचे दुःख निवारण करीत राहिले.आपणही धम्माचे प्रचारक आहात.म्हणून समाजात तुमचा सन्मान आहे.लोकांना तुम्ही प्रेमाने जिंका.

त्यांचा द्वेष करून काही साध्य होणार नाही.पोलीस,कोर्ट कचेरी,सरकारी कार्यालयात फिरणे.हे आपले काम नाही. आपल्याच लोकांच्या विरोधात तक्रार दाखल करणे योग्य आहे का.....?. आपल्याच लोकांच्या कडून तुमच्या जीवाला धोका कसा काय असू शकतो.....? ज्यांच्या विरोधात आपण तक्रार केली.त्यातील बऱ्याच लोकांनी समाज सेवेत आपले आयुष्य घालवलेले आहे.तरी सर्वाना घेऊन बसा. (मिस गाईड करणारे लोक सोडून) आणि सरकारशी सहकार्य करून या जमिनीवर लोकांसाठी विविध वास्तू कशा उभ्या राहतील. सरकारचा निधी जास्तीत जास्त कसा मिळेल याचा विचार करा. संघर्ष करण्यात वेळ घालवू नका ही नम्र विनंती.बाकी निर्णय तुमचाच आहे.

**पत्रकार बाबा रामटेके**
**८०९७५४०५०६,**
**कल्याण,जिल्हा ठाणे.**

# सावधान!कोणत्याही नशेच्या आहारी जाल तर मृत्यूच्या खाईत पडाल!


दरवर्षी २६ जूनला जगभर आंतरराष्ट्रीय नशा निरोधक दिवस साजरा केल्या जातो.नशेली वस्तुंचे निवारण व्हावे या उद्देशाने संयुक्त राष्ट्र महासभेने ७ डिसेंबर १९८७ ला एक प्रस्ताव पारित केला व त्या अनुषंगाने युनोने १९८८ पासून दरवर्षी नशेली पदार्थांच्या सेवनाने होणाऱ्या दुष्परिणामाच्या प्रती समाजात जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने दरवर्षी २६ जूनला आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिवस म्हणून साजरा केल्या जातो. सध्याच्या आधुनिक युगात नशेच्या सेवनाचे प्रमाण वाढल्याने नशेली पदार्थांचा वाममार्गाने मोठा व्यापार आपल्याला दिसुन येतो. कोणतीही नशा असो शरिराला व आयुष्याला घातकच आहे.कारण नशा हा शब्दच असा आहे की प्रत्येकांचे आयुष्य उद्ध्वस्त करतो मग ती कोणतीही नशा असो. त्यामुळे आजच्या युवा पिढीने नशेली पदार्थांपासून सावधान रहाणे अत्यंत गरजेचे आहे.

कारण नशेली वस्तू युवावर्गापर्यत पोहोचविण्याचे काम तस्करीच्या माध्यमातून केले जाते.भारतात बांगलादेश,पाकिस्तान,नेपाळ,ईरान, अफगाणिस्तान मार्गे विदेशी तस्कर नशेली पदार्थ पुरविण्याचे काम करीत असतात.ड्रग्स पुरवठ्याचे जाळे तस्करीच्या माध्यमातून संपूर्ण जगभर विनल्या गेले आहे.भारतात दर महिन्याला अवैधरित्या आलेली करोडो रुपयांची ड्रग्स,एमडी पकडली जाते.तरीही युवावर्गामध्ये नशेचे प्रमाण अजूनही कमी झालेले नाही ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.२२ जून २०२४ ला गुजरातच्या समुद्र किनाऱ्यावर बीएसएफ जवानांनी १५० करोड रुपयांची ड्रग्स पकडली ही ड्रग्स कच्छच्या क्रिक भागात लावारिस पडलेली सापडली.

सरकारी माहितीनुसार या ड्रग्सचे तार ईरान व अफगाणिस्तानशी असल्याचे सांगण्यात आले होते.यावरून स्पष्ट होते की काही विदेशी असामाजिक तत्व भारतीय युवा पिढीला नेशेच्या खाईत लोटण्याचे काम करीत आहे.त्यामुळे आजच्या तरुण पिढीने व युवा वर्गाने नशेली पदार्थांपासून सावध रहाने अत्यंत गरजेचे आहे.कारण कोणतीही नशा ही महाघातक असते. कोणत्याही नशेपासुन शरिराला यत्किंचितही लाभ होत नाही;उलट त्याचे शरिरावर व परिवारावर मोठ्या प्रमाणात दुष्परिणाम होतांना दिसतात.

सध्याच्या परिस्थितीत हॉटेल किंवा हुक्का पार्लर किंवा पानठेला येथुन ड्रग्सचा पुरवठा होतो हेही लक्षात आले आहे. त्यामुळे अशा हॉटेलवर प्रशासनाकडुन कठोर कारवाई व्हायला हवी.अशाच पध्दतीने पबमध्ये सुद्धा ड्रग्सचा गोरखधंदा चालत असावा याला सुध्दा नाकारता येत नाही.यावर प्रशासनाने लक्ष केंद्रित केले पाहिजेत.देशात नशेली पदार्थांवर प्रतीबंध आहे. परंतु तस्करीच्या माध्यमातून अफीम, गांजा, भांग, कोकेन,हेरोइन,एमडी, सारखे अंमली पदार्थ युवा पिढीपर्यंत वाममार्गाने पोहचवु त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त करण्याचे काम असामाजिक तत्व वेळोवेळी करीत असतात. परंतु आजचा युवावर्ग जागृक आहे त्यांनी प्रत्येक नशेली पदार्थांपासून सावध रहाले पाहिजे व त्याचा कडाडून विरोध करायला पाहिजे.

देशासह जगातील युवावर्गाने २६ जूनला शपथ घेतली पाहिजे की मी माझ्यासाठी, माझ्या परिवारासाठी व देशाच्या भविष्यासाठी यापुढे कोणतीही नशा करणार नाही तेव्हाच खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिवस समजल्या जाईल.कारण ड्रग्सची नशा ही नशा करणाऱ्यांचे आयुष्याची छल्ली तर करतोच सोबतच परिवाराला असमंनजस्यतेमध्ये टाकुन संपूर्ण परिवार विस्कळीत होतो. यामुळे संपूर्ण घर उध्वस्त होते याचे मुख्य कारण म्हणजे फक्त नशा.त्यामुळे कोणतीही नशा म्हणजे आयुष्याचा शेवट ही बाब सर्वांनीच लक्षात ठेवली पाहिजे.कोणतीही नशा असो ती शरीराचा विकास तर करीत नाहीच हालाकी शरिराला ''छल्ली'' व छिन्नविछिन्न करण्याचे काम करीत असते व स्लोपॉयझनचे काम करून मृत्युला जवळ करीत असते.आपण साधारणतः नशेली वस्तू व पोषक वस्तू यांचा विचार केला तर मनुष्यासाठी नशेली वस्तूंच्या तुलनेत पोषक वस्तू खुपचं स्वस्त असतात. त्यामुळे नशा करणाऱ्यांनी मनावर ताबा ठेवुन नशेली पदार्थांचा विरोध करावा व युवकांनीच जगाला संदेश देवुन नशेली पदार्थांचा निषेध केला पाहिजे. कोणत्याही नशेली वस्तुंसाठी रांगेत उभे रहाने म्हणजे ''मृत्यूच्या रांगेत''उभे रहाल्यासारखे आहे. याची जानीव आजच्या युवा पिढीने लक्षात ठेवली पाहिजे. कोणीही कीतीही नशेली वस्तु देण्याचा प्रयत्न केला तरीही आपण जर आपल्या मनावर ताबा ठेवला तर कोणतीही नशेली वस्तु तुम्हाला स्पर्शसुध्द करू शकत नाही हेसुद्धा तेवढेच सत्य आहे.



त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत प्रत्येकांनी आपल्या आयुष्याची काळजी घ्यायला हवी.त्यामुळे कोणत्याही नशेपासुन सावधगिरी बाळगली पाहिजे. आपण सुदृढ रहालो तर आपली पिढी सुदृढ राहील'' त्याचप्रमाणे ''आपण सुरक्षीतरीत्या जगलो तर तर देश सुरक्षित राहील, देश सुरक्षित रहाला तर जग अवश्य सुरक्षित होईल.याकरीता अंमली पदार्थ विरोधी दिनाच्या निमित्ताने आपण ''संकल्प'' करूया की नशेली वस्तूला टाटा-बाय-बाय करू या.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो. नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# केज शहरातील कानडी रोडवर पहिल्याच भुरभुरीत तलाव झाला तयार!

## ➤ यश कन्ट्रक्शन सा.बां.उपविभागाचे जावाई आहेत काय? धोंड्याचा महिना संपला तरी यशला जाग कशी येईना

## ➤ यश कन्ट्रक्शन चा नागरिकांच्या जीवीताशी खेळ!



**केज/प्रतिनिधी :**केज शहरातील कानडी रोडचे काम सा.बां.उपविभागाने आपले लाडके जावाई यश कन्ट्रक्शनला दिले होते हे काम या गुत्तेदारांनी गेल्या अनेक दिवसांपासून पुर्ण न करता रखडत ठेवले आहे.आत्तापर्यंत उन्हाळ्याचे दिवस होते.त्यामुळे सद्या ठिक होते. मात्र सद्या पावसाळ्याचे दिवस सुरु झाले असुन काल पासून केज तालुक्यात पावसाला सुरुवात झाली असून काल झालेल्या पहिल्याच भुरभुरीत केज शहरात मोठा पाऊस पडला नसला तरी भुरभुरी सारख्या पावसानेच कानडी रोडवर पाणी जाण्यासाठी वाट नसल्याने रस्त्यावरच पाणी साचून तेथे तलावाचे स्वरूप आले असून यामुळे प्रवासी,नागरिक त्रस्त झालेले आहेत.

या घटनेने संबंधित गुत्तेदाराला काही एक देणेघेणे नसल्याचे यावरुन दिसत आहे.त्यामुळे गुत्तेदार सुस्त असल्याचे प्रवासी नागरिकांतून बोलले जात आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम उपविभागाचा भोंगळ कारभारामुळे नागरिकांना व वाहनचालकांना नाहक त्रास सहन करावा लागत असुन तारेवरची कसरत करावी लागत आहे.

यश कंट्रक्शन कंपनीला सा.बां. उपविभाग केज नेमक अभय का देत आहे. का यश कन्ट्रक्शन हे सात.बां.उपविभाग केजचे जावाई आहेत काय? असा सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज शहरातील कानडी रोडचे काम हे यश कंट्रक्शन कंपनी ही करत आहे. या रस्त्याचे काम हे सार्वजनिक बांधकाम उपविभाग केज यांच्या देखरेखेखाली व मार्गदर्शनाखाली गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहे. म्हणजे जवळपास मागील दोन ते अडीच वर्षापासून या रस्त्याचे काम कासव गतीने सुरू आहे. अद्यापही या रस्त्याचे काम पूर्ण झालेले नाही. अनेक ठिकाणी काम अपूर्ण असल्यामुळे या भागातील नागरिक, संघटना व पक्षाच्या पदाधिकाऱ्याने अनेक वेळा आंदोलने करून या बाबत आवाज उठवला आहे.

वेळोवेळी या आंदोलनाची दखल घेत केज नगरपंचायतने यश कंट्रक्शन कंपनी व सार्वजनिक बांधकाम उपविभागीय यांना सूचना दिलेल्या असताना देखील अद्यापही या रस्त्याचे काम अपूर्ण असल्यामुळे कानडी रोडवरील व्यापारी, या भागातील नागरिक, खाजगी क्लासेसला व शाळेला जाणारे विद्यार्थी, कानडी माळी, लव्हुरी, विडा, येवता, कोल्हेवाडी, तरनळी यासह ग्रामीण भागातील अनेक गावचे नागरिक वाहन चालक हे त्रस्त झालेले आहेत. या रस्त्याचे जागोजागी काम अपूर्ण असल्यामुळे वाहन चालकाला व नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. गुरुवार रोजी केज शहरात पाऊस झाल्यामुळे कानडी चौक ते विजय कृषी सेवा केंद्र, पारस स्वीट होम पर्यंत अक्षरशः रस्त्यावर पाणी साठल्याने तलावाचे स्वरूप आले होते.

रस्त्याने जाणाऱ्या व येणाऱ्या नागरिकांना पाण्यातून येत जा करता येत नव्हती. जवळपास गुडघ्यापर्यंत पाणी साठले होते. त्यामुळे मोटरसायकल चालकांना व वाहनांच्या चालकांना देखील तारेवरची कसरत करावी लागली. याच परिसरामध्ये खाजगी क्लासेस व मुलींची शाळा जवळच कॉलेज असल्याने या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात रहदारी असते.

मागील दोन ते अडीच वर्षापासून धिम्या कासव गतीने यश कंट्रक्शन कंपनी काम करत आहे व नागरिकांना, व्यापाऱ्यांना, शाळेतील विद्यार्थी, वाहन चालक व या भागातील नागरिकांना वेठीस धरण्याचे काम सदरील कंट्रक्शन कंपनी करत आहे. या रस्त्यावर अनेक वेळा मोठमोठे अपघात घडलेले आहेत.

या रस्त्याचे काम चांगल्या क्वालिटीचे/दर्जाचे करून घेण्याची जबाबदारी ही सार्वजनिक बांधकाम उपविभाग केज यांची असताना या विभागाचे कर्मचारी अधिकारी हे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत असा आरोप जनसामान्यातून केला जात आहे. अनेक वेळा यश कंट्रक्शन कंपनीच्या विरोधात आंदोलने करण्यात आलेली आहेत. परंतु प्रशासनाकडून व यश कंट्रक्शन कंपनीने कसल्याच प्रकारची दखल घेतलेली नाही. यश कंट्रक्शन कंपनीला नेमके अभय कोणाचे आहे. व सार्वजनिक बांधकाम उपविभाग यश कंट्रक्शन कंपनीला पाठीशी घालते आहे काय ? असा सवाल जनतेतून उपस्थित केला जात आहे. का यश कन्ट्रक्शन हे बांधकाम उपविभागाचे जावाई तर नाहीत ना? आणि असतील तर आता धोंड्याचा महिना संपला आहे. यशने आता जागे होणे गरजेचे असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे.

# राज्यातील ७० टक्के शेतकरी कर्ज माफीपासून वंचित राहणार आहेत : आमदार रोहित पवार

**लातूर/प्रतिनिधी :** महायुती सरकारने च्या कर्जमाफीसाठी काढलेल्या शासकीय ध्यादेशात तीन त्रुटी आहेत. त्यामुळे राज्यातील ७० टक्के शेतकरी बांधव कर्ज माफीपासून वंचित राहण्याची शक्यता असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आ. रोहित पवार यांनी गुरुवारी लातुरात पत्रकारांशी बोलताना केले.सत्तेत असलेले सत्ताधारी पक्षाचे मंत्री - आमदारही हा विषय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर बोलायला भितात,असा आरोपही त्यांनी यावेळी केला.



शेतकऱ्यांच्या कर्ज माफीच्या प्रश्नावर आपण देवभूमी पंढरपूरमध्ये अन्नत्याग आंदोलन केले. तेव्हा शासनाने २२ जूनच्या आधी वेळ देण्याचा शब्द दिला होता. हा शब्द अद्यापपर्यंत पाळला गेला नसल्याचे सांगून आ. रोहित पवार पुढे म्हणाले की, या प्रकरणी सरकारकडून थातुर मातुर उत्तरे देऊन वेळ मारून नेण्याचे काम केले जात आहे. शासनाकडून कर्ज माफीच्या संदर्भात ठोस शब्द मिळाल्याशिवाय आता आपण थांबणार नाही. याच कारणासाठी आपण मराठवाड्याचा दौरा करून शेतकऱ्याशी बोलत आहोत आहोत. राज्यातील अनेक जिल्ह्यात अशा प्रकारचा गोंधळ चालू आहे. याचा सर्वस्वी निर्णय मुख्यमंत्र्यांच्या हातात आहे, पण मुख्यमंत्री त्यावर निर्णय घेणे तालात असल्याचे आ. पवार म्हणाले. त्यासाठीच येत्या दि. २९ जून २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे शेतकरी आंदोलन करणार आहोत. सध्याच्या काळातील हे सर्वात मोठे आंदोलन असेल असा विश्वास व्यक्त करून शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत आता माघार घेणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कर्जमाफीसाठी नियमित शेतकऱ्यासाठीची मर्यादा पन्नास हजारांवरून एक लाख करावी अशीही आपली आग्रही मागणी आहे. शेतकऱ्यांच्या या ज्वलंत प्रश्नावर महाविकास आघाडीची रस्त्यावर उतरण्याचीही तयारी आहे. मागच्या वर्षीच्या अतिवृष्टीच्या काळात नुकसानग्रस्त शेतकर्यांस्तही शासनाने ३१ हजार कोटींचे पॅकेज घोषित केले होते. त्यापैकी शेतकऱ्यांपर्यंत १२ ते १५ कोटी रुपयेच पोहोचल्याचे आ. रोहित पवार यांनी सांगितले. बाकीचे पैसे विमा कंपन्याकडून वसूल करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. प्रत्यक्षात मात्र शासनाने विमा कंपन्यांचा फायदा बघितल्याचा आरोप त्यांनी केला. शासनाने शेतकऱ्यांची सरसकट कर्ज माफी करावी,अशीही आपली मागणी असल्याचे ते म्हणाले.

यावेळी बोलताना आ. रोहित पवार यांनी अजितदादा पवार यांच्या अपघाताची सीआयडी - सीबीआय चौकशीची मागणी करूनही त्यावर सरकारकडून ठोस निर्णय घेतला जात नसल्याचे सांगून या प्रकरणाची आता न्यायालयीन चौकशी व्हावी अशी आपली मागणी असल्याचे नमूद केले. शक्तीपीठ महामार्ग महाराष्ट्राच्या हिताचा मुळीच नसून या योजनेच्या माध्यमातून राज्यातील महायुतीचे नेते ४० हजार कोटी रुपयांचा मलिदा खाणार असल्याचा आरोप केला. शेतकऱ्यांचे हित न बघणारे हे सरकार स्वतःचा स्वार्थ साधून घेण्याची एकही संधी सोडत नाही,असेही त्यांनी बोलून दाखविले.

याप्रसंगी बसवराज पाटील नागराळकर, माजी आमदार पृथ्वीराज साठे, संजय शेटे, एड. संभाजीराव पाटील, राजा मणियार, राजेसाहेब देशमुख यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मगंल काकडे यांना कृषिभूषण पुरस्कार जाहीर; महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत सन २०२३ चा प्रतिष्ठेचा जिजामाता

**केज/प्रतिनिधी :** कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत प्रदान करण्यात आलेला महाराष्ट्र कृषीभूषण पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल मंगल बाळासाहेब काकडे यांचा बनसारोळा व परिसरातील नागरिकांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी सामाजिक, शैक्षणिक व कृषी यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्कार समारंभात मान्यवरांनी काकडे यांच्या कृषी क्षेत्रातील योगदानाचा गौरव करत त्यांच्या कार्याचे कौतुक केले. आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अवलंब, शेतकऱ्यांमध्ये जनजागृती आणि कृषी विकासासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे त्यांना हा मानाचा पुरस्कार प्राप्त झाल्याचे वक्त्यांनी सांगितले. सत्काराला उत्तर देताना मंगल बाळासाहेब काकडे यांनी म्हटले की,हा सन्मान केवळ स्वतःचा नसून परिसरातील सर्व शेतकरी बांधवांचा असल्याचे सांगितले. भविष्यातही शेती क्षेत्राच्या विकासासाठी आणि शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी कार्यरत राहण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाला उपस्थित नागरिकांनी त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देत अभिनंदन केले. सत्कार समारंभ आनंदी व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी अनिल जोगदंड, रशिकांत जोगदंड,गुणवंत धायगुडे,दता काकडे,औरंगपुरचे माजी सरपंच सुधीर रानमारे, रमेश गोरेमाळी,बाळु गोरे बिभिषन गोरे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# बिनविरोध निवडींची नवीन फॅशन

## लोकशाहीची प्रगल्भता की तडजोडीचे राजकारण?

नुकत्याच पार पडलेल्या विधानपरिषद निवडणुकीत १७ पैकी ६ आमदार बिनविरोध निवडून आले.ही घटना संपूर्ण महाराष्ट्रात आणि राजकीय वर्तुळात मोठी चर्चेची ठरली आहे. उमेदवारांना बिनविरोध निवडून आणण्यासाठी पडद्यामागे मोठ्या घडामोडी घडल्याचे या निमित्ताने समोर आले. ही 'बिनविरोध' निवडींची नवीन फॅशन सध्याच्या राजकारणात वेगाने मूळ धरत आहे.यामुळे निवडणुकांचा मोठा खर्च आणि वेळ वाचतो असा एक युक्तिवाद केला जातो.परंतु,या प्रक्रियेमुळे लोकशाहीची प्रगल्भता वाढते आहे की,हे केवळ तडजोडीचे सोयीस्कर राजकारण आहे, याचा सखोल विचार करण्याची वेळ आता आली आहे.


भारतीय संविधानाने राज्यांमध्ये द्विगृहात्मक कायदेमंडळाची व्यवस्था केली आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम १६९ नुसार राज्यांमध्ये विधानपरिषद स्थापन करण्याचा किंवा ती रद्द करण्याचा अधिकार संसदेला आहे.तसेच,कलम १७१ नुसार विधान परिषदेच्या रचनेची माहिती दिली आहे.विधानपरिषदेतील एकूण सदस्यसंख्या त्या राज्याच्या विधानसभेच्या एकूण सदस्यसंख्येच्या (१/३) पेक्षा जास्त नसावी.ही संख्या कोणत्याही परिस्थितीत ४० पेक्षा कमी असू नये.हे एक कायमस्वरूपी सभागृह आहे,म्हणजेच ते कधीही पूर्णपणे विसर्जित होत नाही.प्रत्येक सदस्याचा कार्यकाळ ६ वर्षांचा असतो आणि दर २ वर्षांनी (१/३) सदस्य निवृत्त होतात.

विधानपरिषदेची निवडणूक ही थेट जनतेद्वारे होत नाही,तर ती अप्रत्यक्ष निवडणूक पद्धतीद्वारे घेतली जाते.यासाठी 'प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धतीनुसार एकल संक्रमणीय मताद्वारे' (Proportional Representation by Means of Single Transferable Vote) गुप्त मतदान घेतले जाते. या सभागृहातील सदस्यांची निवड विविध घटकांमधून होते:(१/३) सदस्य: स्थानिक स्वराज्य संस्थांकडून (नगरपालिका,जिल्हा परिषद इ.) निवडले जातात.(१/३) सदस्य: विधानसभेच्या आमदारांकडून (MLAs) निवडून दिले जातात. (१/१२) सदस्य: किमान ३ वर्षे आधी पदवीधर झालेल्या मतदारांकडून निवडले जातात.(१/१२) सदस्य: किमान ३ वर्षे माध्यमिक शाळेत शिक्षक म्हणून काम करणाऱ्यांकडून निवडले जातात. उर्वरित सदस्य ((१/६): राज्यपाल कला,साहित्य, विज्ञान,सहकार चळवळ आणि सामाजिक सेवा या क्षेत्रातील तज्ज्ञांमधून नामनिर्देशित करतात.

संविधानाने विधानपरिषदेची रचना करण्यामागे एक उदात्त हेतू ठेवला आहे. या वरिष्ठ सभागृहाचे महत्त्व खालील मुद्द्यांमधून स्पष्ट होते:तज्ज्ञांचे प्रतिनिधित्व: जे बुद्धिजीवी,प्राध्यापक,डॉक्टर,शास्त्रज्ञ किंवा कलाकार थेट निवडणुकीच्या राजकारणात आणि पैशांच्या खेळात उतरू शकत नाहीत,त्यांना या सभागृहाच्या माध्यमातून कायदेमंडळात घेता येते. घाईघाईने होणाऱ्या कायद्यांवर अंकुश: विधानसभेने राजकीय दबावाखाली किंवा घाईघाईने मंजूर केलेल्या कायद्यांवर पुनर्विचार करण्याचे आणि त्यातील त्रुटी दाखवून देण्याचे काम हे वरिष्ठ सभागृह करते.गंभीर चर्चांचे व्यासपीठ: हे सभागृह राजकीय गदारोळापेक्षा अधिक गंभीर,अभ्यासू आणि वैचारिक चर्चांसाठी ओळखले जाते.

वर्तमानात काय चालले आहे? (तडजोडीचे राजकारण) वरिष्ठ सभागृहाचा मूळ घटनात्मक हेतू आजच्या राजकारणात हरवत चालल्याचे चित्र दिसत आहे. वर्तमानात या सभागृहाचा वापर तज्ज्ञ व्यक्तींना संधी देण्यासाठी नाही, तर राजकीय पक्षांमधील नाराजांचे पुनर्वसन करण्यासाठी केला जात आहे.सध्याच्या काळात पक्षांतर्गत बंडखोरी टाळण्यासाठी किंवा मित्रपक्षांना खूश करण्यासाठी जागांची अदलाबदल केली जाते. निवडणूक झाल्यास स्वतःचा उमेदवार पडेल किंवा पक्षाची मते फुटतील या भीतीने पक्षप्रमुख एकत्र येतात.पडद्यामागे तडजोडी करून निवडणुका बिनविरोध केल्या जातात.यामुळे सर्वसामान्य कार्यकर्त्याला किंवा खऱ्या अर्थाने पात्र असलेल्या तज्ज्ञ व्यक्तीला डावलून केवळ नेत्यांच्या मर्जीतील लोकांना सभागृहात पाठवले जात आहे.

'बिनविरोध निवडणूक' म्हणजे जेव्हा एखाद्या जागेसाठी केवळ एकच उमेदवार अर्ज भरतो किंवा इतर सर्व उमेदवार आपले अर्ज मागे घेतात. जुन्या काळात गावपातळीवर किंवा सहकार क्षेत्रात एकोपा राखण्यासाठी ही पद्धत वापरली जायची. परंतु,आजच्या आधुनिक राजकारणात या संकल्पनेचा अर्थ पूर्णपणे बदलला आहे. आजची बिनविरोध निवड ही वैचारिक एकोप्यातून नाही,तर राजकीय पक्षांच्या स्वतःच्या सोयीच्या समीकरणांमधून होताना दिसत आहे.लोकशाहीचा सर्वात मोठा कणा म्हणजे 'मतदान' आणि मतदारांना मिळणारे 'पर्याय'.जेव्हा एखादी निवडणूक बिनविरोध केली जाते, तेव्हा थेट लोकप्रतिनिधींच्या मतदानाच्या हक्कांवर गदा येते.मतदारांना त्यांच्या आवडीचा उमेदवार निवडण्याची संधीच मिळत नाही.सर्वच राजकीय पक्ष जेव्हा आपापसात जागा वाटून घेतात,तेव्हा मतदारांसमोर विचारांचा आणि उमेदवारांचा पर्यायच शिल्लक राहत नाही.हा एक प्रकारे लोकशाहीतील अधिकारांचा संकोच आहे.



आजकाल निवडणुका बिनविरोध करण्यासाठी 'साम,दाम,दंड,भेद' या चारही सूत्रांचा सर्रास वापर केला जातो. विरोधकांचे अर्ज बाद करणे,उमेदवारांवर दबाव आणणे किंवा त्यांना मोठ्या पदांचे आमिष दाखवणे असे प्रकार घडतात.निवडणूक टाळण्यासाठी किंवा स्वतःची जागा सुरक्षित करण्यासाठी पडद्यामागे मोठ्या आर्थिक उलाढाली आणि 'घोडेबाजार' होण्याची भीती वाढली आहे.ही प्रवृत्ती लोकशाहीला घातक असून यामुळे पैशाच्या आणि सत्तेच्या बळावर निवडणुका मॅनेज करण्याची नवी फॅशन सुरू झाली आहे.या तडजोडीच्या राजकारणामुळे विरोधी पक्षांचे आणि नवीन कार्यकर्त्यांचे मनोधैर्य पूर्णपणे खचून जाते. संघर्ष न करताच जागा सोडून दिल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नैराश्य येते. याचा सर्वात मोठा फटका सर्वसामान्य जनतेला बसतो.जनतेचे प्रश्न मांडणारा खंबीर विरोधकच सभागृहात किंवा मैदानात उरत नाही.सत्ताधारी आणि विरोधक एकत्र आल्यामुळे सर्वसामान्यांचे प्रश्न बाजूला पडतात आणि केवळ नेत्यांचे वैयक्तिक हितसंबंध जपले जातात. खर्च वाचवणे किंवा राजकीय स्थैर्य आणणे या नावाखाली जर लोकशाहीचा आत्मा आणि संविधानाचा मूळ हेतूच धोक्यात येत असेल,तर याला प्रगल्भता म्हणता येणार नाही. लोकशाही जिवंत,निकोप आणि सशक्त ठेवण्यासाठी निवडणुका होणे, मतदारांना मतदानाचा हक्क मिळणे आणि विचारांची लढाई मैदानात लढली जाणे अत्यंत आवश्यक आहे.तरच सर्वसामान्य माणसाची लोकशाहीवरील आणि वरिष्ठ सभागृहाच्या पवित्रतेवरील श्रद्धा कायम राहील.

**लेखिका: संगीता हत्तीमारे -पालकर**
**(एम.ए.राज्यशास्त्र)**
**मो.८३९०२२७२२०,गोंदिया.**

# लातुरात महेश भूषण, महेश गौरव, महेश सेवा पुरस्काराचे थाटात वितरण

## नव युवक - युवतींनी संस्काराच्या मर्यादेचं उल्लंघन करू नये : अनिलकुमार नावंदर

**लातूर/प्रतिनिधी :** मानवी जीवनात संस्काराचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. कोणताही समाज संस्काराच्या शिदोरीवरच टिकून असतो. संस्काराशिवाय सुखी, समृद्ध जीवनाची कल्पना अशक्य आहे. आई वडील आपल्या मुला - मुलींवर नेहमीच चांगले संस्कार करण्याचा प्रयत्न करत असतात. समृद्ध जीवनासाठी नव युवक - युवतींनी कदापि संस्काराच्या मर्यादेचं उल्लंघन करू नये असे प्रतिपादन महाराष्ट्र केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे सचिव तथा खामगावचे प्रेरणादायी वक्ते अनिलकुमार नावंदर यांनी केले.

लातूर जिल्हा माहेश्वरी सभेच्या वतीने श्री महेश नवमीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी विविध क्षेत्र उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना प्रमुख अतिथींच्या हस्ते महेश भूषण, महेश गौरव, महेश सेवा पुरस्काराचे थाटात वितरण करण्यात आले.

यावेळी मंचावर लातूर जिल्हा माहेश्वरी सभेचे अध्यक्ष सीए प्रकाश कासट, सचिव राजेशकुमार मंत्री, अ.भा. महासभा सदस्य हुकूमचंद कलंत्री, फुलचंद काबरा, बालकिशन मुंदडा, जगदीश भुतडा, माहेश्वरी



महिला संगठनच्या प्रदेश सचिव सौ. अनिता मालू, लातूर जिल्हा माहेश्वरी सभेच्या अध्यक्षा सौ. ललिता राठी, माहेश्वरी युवा संगठन चे महाराष्ट्र प्रदेश सहकारमंत्री राम भुतडा, जिल्हा युवा माहेश्वरी संगठन अध्यक्ष अभिषेक मुंदडा, शहर माहेश्वरी सभेचे अध्यक्ष लक्ष्मीकांत सोनी,युवा माहेश्वरी अध्यक्ष निकुंज भुतडा, माहेश्वरी किशोरी मंडल अध्यक्ष प्रांजळ डागा, संयोजक ईश्वर बाहेती, संतोष तोष्णीवाल, गणेश हेड्डा, राहुल लोया, एड. नंदकिशोर लोया, ईश्वर चांडक आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विखरत चाललेले संस्कार आणि तुटत जाणारे नाते या विषयावर प्रेरणादायी वक्ते अनिलकुमार नावंदर यांनी अतिशय प्रखर भाषेत आपले विचार व्यक्त केले.

माहेश्वरी समाज संस्कारात तसेच दानातही कायम सर्वात पुढे असल्याचे सांगून ते म्हणाले की, जीवनात प्रत्येक गोष्टीत विचार आवश्यक असतात. सध्यस्थितीत स्वार्थ वाढल्याने समाजात कुटुंबा - कुटुंबात वाद, कलह वाढत जात आहेत. परिवार तुटत आहेत. भौतिकवाद आणि पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण वाढल्याने असे घडताना दिसून येते. परिवार एकसंघ ठेवण्यासाठी परिवारातील प्रत्येक सदस्यात संवाद होणे आवश्यक आहे. पालकांनी आपल्या मुलांना एवढेही लायक बनवू नये की, मुलांनी आई वडिलांनाच नालायक नाही समजले पाहिजे. आज आई वडील आपल्या मुलींनाही स्वातंत्र्य देताना दिसतात. पण मुलींनी मर्यादा नाही पाळल्यास त्यांच्यावरही निर्बंध आणणे गरजेचं आहे.

मुलांच्या सुरक्षित भवितव्यासाठीपालकांनी वेळ न दवडता आत्ताच त्यांच्याशी संवाद साधून संस्कार करणे गरजेचे असल्याचे नावंदर यांनी स्पष्ट केले.

यावेळी महेश सेवा पुरस्काराने रामानुज रांदड, गोवर्धनदास भंडारी, प्रा. डॉ. ईश्वरप्रसाद बिदादा, महेश गौरव पुरस्काराने जवाहरलाल धूत, भगवानदास सोनी, हभप. वीरनाथ लड्डा यांना तर महेश भूषण पुरस्काराने दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी यांना प्रमुख अतिथींच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे क्रीडा क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल डॉ. ब्रिजमोहन झंवर, डॉ. आरती झंवर, संजीव भार्गव, प्रज्वल रांदड यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. पुरस्कार प्राप्त मान्यवरांच्या वतीने रमेश बियाणी यांनी मनोगत व्यक्त करताना या पुरस्काराच्या प्रेरणेने आपण आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत सामाजिक कार्य करत राहू असे सांगितले.

प्रास्ताविक सीए प्रकाश कासट यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी महेश नवमीच्या निमित्ताने लातुरात आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. या कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिका १२६० घरांपर्यंत प्रत्यक्ष जाऊन देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यामध्ये ३७० नवीन घरांची नोंद झाली. म्हणजे लातूर शहरात आजघडीला दिड हजार पेक्षा अधिक घरे माहेश्वरी समाजबांधवांची असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमासाठी समाजातल्या ५८३ व्यक्तींकडून आर्थिक सहायता घेतल्याचेही त्यांनी नमूद केले. सर्वांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वी होऊ शकला असे सांगून पुढील वर्षीच्या भोजन प्रसादाचे मानकरी लोया - लोहिया परिवार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन चैतन्य भार्गव, डॉ. लीला कर्वा यांनी केले. सौ. प्रीती बियाणी यांनी महेश वंदना प्रस्तुत केली. दयानंद सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लातूर जिल्हा माहेश्वरी सभा, लातूर जिल्हा माहेश्वरी महिला संगठन,लातूर जिल्हा माहेश्वरी युवा संगठन, लातूर शहर माहेश्वरी सभा, लातूर माहेश्वरी महासभा, गावभाग माहेश्वरी मंडळ, महेश सेने, भाग्य नगर माहेश्वरी मंडळ, बार्शी रोड माहेश्वरी मंडळ, अपनी राधाकृष्ण गोशाळा, माहेश्वरी युगल्स, युवा माहेश्वरी, माहेश्वरी किशोरी मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# डॉक्टर कडून मुदत संपलेले औषध रुग्णाला दिल्याने कारवाईची मागणी... रुग्ण हक्क संरक्षण समिती चे सहाय्यक औषध आयुक्त यांना निवेदन...



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर मधील बार्शी रोड वरील नवजीवन हॉस्पिटल मधील डॉक्टरने एका रुग्णास तपासल्यावर त्यांना त्यांच्या लेटर हेड वर अनेक औषध टॅबलेट लिहून दिले त्यातील १० टॅबलेट डॉक्टरनी स्वतः कडील जे की विक्रीसाठी नसलेले सॅम्पल टॅबलेट रुग्णाला दिले सदर रुग्ण घरी गेला आणि प्रत्येकी एक टॅबलेट डॉक्टरने सांगितले त्याप्रमाणे सेवन केले. नंतर रुग्णाला अस्वस्थ वाटू लागले म्हणून रुग्णाला दुसऱ्या हॉस्पिटल मध्ये अँडमिट केले. रुग्णांचे नातेवाईक भागवत कायते यांनी नवजीवन हॉस्पिटल ने दिलेले औषध सहज निरीक्षण करताना त्यांना त्यातील - टॅबलेट जे की डॉक्टरने स्वतःहुन रुग्णाला दिली होती त्या टॅबलेट ची तारीख हि मुदत संपलेली म्हणजे एक्सपायरी झालेले निदर्शनास आले या बाबत नंतर डॉक्टर यांना भेटून जाब विचारले असता डॉक्टरने चूक कबूल करून टॅबलेट सेवन करून रुग्णाला काही झाले नाहीना रुग्ण मेला तर नाहीना तुम्हाला काय करायचे ते करा म्हणून सांगितले या नंतर रुग्ण नातेवाईक भागवत कायते यांनी रुग्ण हक्क संरक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष अँड निलेश करमुडी, आणि प्रदेशअध्यक्ष हणमंत गोत्राळ यांना संपर्क करून या गंभीर प्रकरणाबाबत कायदेशीर मार्गदर्शन मागितले या नंतर समितीने रुग्णनातेवाईक यांना प्रशासनाकडे रीतसर तक्रार करून कारवाई करणेबाबत मार्गदर्शन केले रुग्णहितार्थ समिती माध्यमातून लातूरचे सहाय्यक औषध आयुक्त यांना रीतसर निवेदन देऊन डॉक्टरची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी केली यावेळी रुग्ण नातेवाईक भागवत कोयते, रुग्ण हक्क संरक्षण समिती संस्थापक अध्यक्ष अँड निलेश करमुडी, प्रदेशअध्यक्ष हणमंत गोत्राळ, जिल्हाअध्यक्ष दिपक गंगणे,संजय उदारे आदी उपस्थित होते

# रविवारी पल्स पोलिओ लसीकरण मोहिम

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरामध्ये रविवार दिनांक २८ जून २०२६ रोजी पल्स पोलिओ लसीकरण मोहिम राबविण्यात येत आहे. या दिवशी ५ वर्षाच्या आतील ४२,८२३ बालकांना पोलिओची लस पाजण्यात येणार आहेत. यासाठी शहरामध्ये एकूण २४० पोलिओ लसीकरण केंद्राच्या ठिकाणी लसीकरणाची सोय उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. यासाठी लातूर महानगरपालिका कार्यालय, एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालय येथील अंगणवाडी कर्मचाऱ्यांची, तसेच विवीध खाजगी शाळांच्या शिक्षकांची बुथप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील त्याचप्रमाणे नर्सिंग स्कूल मधील जी.एन.एम. स्टूडंटचा सहभाग घेण्यात येत आहे. तसेच शहराच्या विविध ठिकाणी, शहराच्या बाहेरील भागातील तुरळक वसाहत, बसस्थानक, बसचे थांबे इ. ठिकाणी बुथची व मोबाईल टिमची सोय करण्यात आली आहे.

तरी सर्व पालकांनी आपल्या कुटूंबातील ५ वर्षाच्या आतील बालकास यापुर्वी किती ही वेळेस पोलिओचा डोस पाजलेला असला तरी, बाळ आजारी असले तरीही (वैद्यकीय अधिकारी यांच्या सल्याने) व नुकतेच जन्मलेले बाळ असले तरीही आपल्या बालकास पोलिओचे २ थेंब नजीकच्या पोलीओ लसीकरण केंद्रावरती जाऊन पाजवून घ्यावे व सहकार्य करावे. पल्स पोलीओ लसीकरण मोहिम यशस्वी करावी असे आवाहन लातूर शहर महानगरपालिका, लातूर च्या वतीने करण्यात येत आहे.

# विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग २६ जून रोजी बंद राहणार

**लातूर/प्रतिनिधी :** विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग शुक्रवार, २६ जून २०२६ रोजी मोहरम निमित्त सार्वजनिक सुट्टी असल्याने बंद राहील. तसेच शनिवार, २७ जून २०२६ पासून बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गरुड यांनी कळविले आहे. रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास सुरु राहणार आहे.

# अमरावती येथील अभ्यासिका प्रकरणातील अनियमित्तेबाबत दोषींवर कारवाई करणार -आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके

**मुंबई/प्रतिनिधी :** अमरावती शहरात आदिवासी विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या अभ्यासिका प्रकरणातील अनियमिततेबाबात संबधित वसतिगृहाचे तत्कालीन प्रभारी गृहप्रमुख आणि गृहप्रमुख (आहरण व संवितरण) यांना निलंबित करण्यात आले आहे.

या प्रकरणाची चौकशी करण्यात येत असून चौकशीत दोषी आढळून येणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी विधानसभेत सांगितले. अमरावती येथील आदिवासी विकास विभागामार्फत अभ्यासिका भाड्याने घेण्याच्या करारात झालेल्या अनियमितेतेबाबत सदस्य सुलभा खोडके यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य सर्वश्री विजय वडेट्टीवार, डॉ. नितीन राऊत, हरिष पिंपळे, नाना पटोले यांनी उपप्रश्न विचारात चर्चेत सहभाग घेतला.

# दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीचे डी.फार्म परीक्षेत दैदिप्यमान यश; गुणवत्तेची परंपरा पुन्हा अधोरेखित



माहीन मणियार ८८.८२ % | प्रतीक्षा सगर ८७.०० % | नेहा सूर्यवंशी ८५.३६ %

शेख तस्मिया ८७.३०% | कारभारी श्रुती ८६.७०% | कांबळे सायली ८६.२०% | मस्के तनिष्क ८६.२०% | पठाण आर्शिया ८६.२०%

**लातूर/प्रतिनिधी :** शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता, शिस्त आणि उत्कृष्ट निकालांची भक्कम परंपरा जोपासणाऱ्या दयानंद शिक्षण संस्थेद्वारे संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीने डी.फार्मसी उन्हाळी-२०२६ परीक्षेत पुन्हा एकदा आपल्या शैक्षणिक उत्कृष्टतेचा ठसा उमटविला आहे. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या या परीक्षेत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत फार्मसी क्षेत्रातील 'लातूर पॅटर्न'ची उज्ज्वल परंपरा अधिक दृढ केली आहे.

डी.फार्मसी द्वितीय वर्षाच्या परीक्षेत मणियार माहिन हिने ८८.८२ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. सगर प्रतीक्षा हिने ८७.०० टक्के गुणांसह द्वितीय, तर सूर्यवंशी नेहा हिने ८५.३६ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. डी.फार्मसी प्रथम वर्षाच्या परीक्षेत शेख तस्मिया हिने ८७.३० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. कारभारी श्रुती हिने ८६.७० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक पटकावला. तर कांबळे सायली, मस्के तनिष्क आणि पठाण आर्शिया यांनी प्रत्येकी ८६.२० टक्के गुण मिळवत संयुक्तरीत्या तृतीय क्रमांकावर आपले नाव कोरले. द्वितीय वर्षातून डिस्टिंक्शनमध्ये १९ तर प्रथम श्रेणीत २५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून प्रथम वर्षातून डिस्टिंक्शनमध्ये १५ तर प्रथम श्रेणीत ३५ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

महाविद्यालयाचा प्रथम वर्षाचा निकाल ९४.७३ टक्के, तर द्वितीय वर्षाचा निकाल ९४.६४ टक्के लागला असून हा निकाल संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्थेची आणि विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमांची साक्ष देणारा ठरला आहे.आधुनिक शैक्षणिक सुविधा, अनुभवी प्राध्यापकांचे मार्गदर्शन, प्रयोगशील अध्यापन पद्धती आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने राबविण्यात येणारे उपक्रम यामुळे दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीने फार्मसी शिक्षण क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

या उल्लेखनीय यशामुळे संस्थेच्या शैक्षणिक वैभवात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते, सर्व मार्गदर्शक प्राध्यापकवृंद, पालकांचे प्रोत्साहन आणि संस्थेने उपलब्ध करून दिलेल्या अभ्यासपूरक वातावरणाला दिले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची जिद्द, चिकाटी व सातत्यपूर्ण मेहनत कारणीभूत असल्याचे त्यांनी सांगितले.

फार्मसी क्षेत्रातही 'लातूर पॅटर्न'ची यशस्वी परंपरा निर्माण करत विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या नव्या शिखरावर नेल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी, सचिव रमेशजी बियाणी, सहसचिव विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव अजिंक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष संजयजी बोरा, प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते, डी.फार्म चे डॉ. प्रकाश शिवनेचारी, डॉ. तनुजा वारद, प्रा. दिपाली स्वामी, प्रा. अंजली साबणे, प्रा. काजल घोडके, प्रा.रागिणी घोटाळे तसेच सर्व प्राध्यापकवृंदांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## संजय राऊतांना बॉम्ब धमकी; 'पोकळ धमक्यांना घाबरू नका, पोलीस योग्य उत्तर देतील' – फडणवीस

नागपूर : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांना मिळालेल्या कथित बॉम्ब धमकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया देताना पोकळ धमक्यांना घाबरण्याचे कारण नसल्याचे सांगितले. धमकी देणाऱ्यांना पोलीस योग्य उत्तर देतील, असा इशाराही त्यांनी दिला. नागपूर येथे पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना खासदार संजय राऊत यांना मिळालेल्या धमकीबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावर उत्तर देताना फडणवीस म्हणाले की, कोणत्याही प्रकारची धमकी गंभीरतेने घेतली जाते. संबंधित व्यक्तीने तक्रार दिली असल्यास पोलीस यंत्रणा त्याची चौकशी करून आवश्यक ती कारवाई करेल. कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना कायद्यानुसार उत्तर दिले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# मुद्रांक नोंदणी प्रकरणातील गैरव्यवहारांच्या चौकशीसाठी स्वतंत्र टास्क फोर्स– महसूल मंत्री बावनकुळे

**मुंबई/प्रतिनिधी :** महसूल विभागातील मुद्रांक नोंदणी प्रक्रियेत झालेल्या कथित गैरव्यवहारांची राज्यस्तरीय चौकशी आता अकाउंटंट जनरल (एजी) कार्यालयामार्फत केली जाणार असून त्यासाठी स्वतंत्र टास्क फोर्स स्थापन करण्यात येईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिली.



विधानसभा सदस्य जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी हा निर्णय जाहीर केला. यावेळी सदस्य नाना पटोले यांनीही उपप्रश्न उपस्थित केला.

मंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यभर झालेल्या सर्व 'ॲडज्युडिकेशन' प्रकरणांची सखोल चौकशी एजीमार्फत करण्यात येणार आहे. केवळ चौकशीचे आदेश देऊन थांबणार नसून एजीच्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्र टास्क फोर्स कार्यरत केली जाईल. या चौकशीसाठी आवश्यक मनुष्यबळ, संसाधने आणि निधी राज्य शासन उपलब्ध करून देणार आहे.

ही चौकशी महसूल विभाग स्वतः करणार नसून संपूर्ण कारभार एजीकडे सोपविला जाणार असून टास्क फोर्समार्फत प्रत्येक प्रकरणाची तपासणी केली जाईल. या चौकशीत मुद्रांक अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबन, फौजदारी गुन्हे दाखल करणे आणि अन्य कठोर कारवाई केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, वरिष्ठ लिपिक राजकुमार दहीफळे यांनी मुद्रांक अधिकारी म्हणून कार्यभार स्वीकारल्यानंतर अवघ्या १० दिवसांत ९४१ हून अधिक दस्तऐवजांची नोंदणी केली. या नोंदण्यांमध्ये एमआरटीपी कायदा १९६६ आणि मुद्रांक नोंदणीसंदर्भातील कायदेशीर तरतुदींचे गंभीर उल्लंघन झाल्याचा आरोप आहे. अनधिकृत इमारतींच्या नोंदणीतून शासनाला सुमारे १३ कोटी ९१ लाख रुपयांचे नुकसान झाले. या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून संबंधित अधिकाऱ्याला निलंबित करण्यात आले आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याला सेवेतून बडतर्फ करण्याच्या दिशेने शासनाची कार्यवाही सुरू आहे.

मुद्रांक विभागातील ॲडज्युडिकेशन प्रक्रिया 'क्वासी-ज्युडिशियल' स्वरूपाची असली तरी ती मुद्रांक अधिनियमाच्या चौकटीतच पार पडली पाहिजे, असे सांगत मंत्री बावनकुळे यांनी नव्या मानक कार्यपद्धतीचा आदेश जारी करण्याची घोषणा केली. यापुढे नियमबाह्य ॲडज्युडिकेशन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची तरतूद करण्यात येणार असून त्यासंदर्भातील शासन निर्णयही काढण्यात येणार असल्याचे मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

# वणव्यांबाबत जनजागृती वाढविण्यावर भर दिला जाणार - वनमंत्री गणेश नाईक

**मुंबई/प्रतिनिधी :** कोकणातील वणव्यांच्या घटनांमागे मोठ्याप्रमाणात जनजागृतीचा अभाव आणि शेतकऱ्यांमधील गैरसमज कारणीभूत असल्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत सांगितले. वणवे रोखण्यासाठी वन विभाग, कृषी विभाग, ग्रामपंचायती, महसूल यंत्रणा; तसेच लोकप्रतिनिधी यांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती मोहीम राबविली जाणार असल्याची माहिती त्यांनी प्रश्नोत्तराच्या तासात दिली.



सदस्य प्रशांत ठाकूर यांनी कोकणातील वणव्यांचा प्रश्न उपस्थित केला होता. त्यास उत्तर देताना मंत्री नाईक म्हणाले की, भातशेती किंवा अन्य शेतीसाठी पालापाचोळा जाळल्यास जमीन अधिक सुपीक होते, असा अनेक शेतकऱ्यांचा समज आहे. प्रत्यक्षात जमीन भाजल्यामुळे तिचा पोत खराब होतो आणि नैसर्गिक कंपोस्टसदृश वातावरण नष्ट होते. त्यामुळे वन विभाग जनजागृतीवर विशेष भर देत आहे.

वणव्यांवर नियंत्रणासाठी ग्रामसेवक, तलाठी, सरपंच, पंचायत समिती, जिल्हा परिषद सदस्य; तसेच आमदार-खासदार यांचे सहकार्य घेतले जात आहे. ठाणे वनवृत्तात १,००९ वणव्यांच्या घटनांमध्ये १,६५९ हेक्टर क्षेत्र जळाले. कोल्हापूर प्रांतात ३४ घटनांमध्ये ८५ हेक्टर, तर मुंबई पश्चिम वन्यजीव विभागाशी संबंधित क्षेत्रात ९५ घटनांमध्ये १४५ हेक्टर क्षेत्र जळीतग्रस्त झाले. या कालावधीत वणव्यांशी संबंधित १,२२६ वनगुन्ह्यांची नोंद झाली असून त्यांचा तपास सुरू आहे, असेही त्यांनी सांगितले.

विडीची जळती काडी फेकणे, शिकार सुलभ व्हावी म्हणून आग लावणे, मोहफुले गोळा करण्यासाठी जंगल जाळणे किंवा शेतातील सुकलेले गवत जाळताना आग नियंत्रणाबाहेर जाणे ही वनव्यांची प्रमुख कारणे आहेत. वणवे रोखण्यासाठी वन विभाग आणि कृषी विभाग संयुक्तपणे काम करत असून शेतकऱ्यांचे अज्ञान दूर करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. आग लागल्यास ती तत्काळ विझविण्यासाठी ब्लोअर आदी यंत्रसामग्रीही उपलब्ध करून दिली जाणार आहे, असेही मंत्री नाईक यांनी सांगितले.

वणव्यांना आळा घालण्यासाठी १९६२ च्या संबंधित कायद्यात सुधारणा करण्याचा विचार सुरू आहे. जाणीवपूर्वक वनांना आग लावणाऱ्यांविरोधात कठोर भूमिका घेतली जाईल; तसेच खाजगी वनक्षेत्रात आग लागल्यास संबंधित जमीनमालकाला जबाबदार धरण्याबाबत कायदेशीर तरतूद करता येईल का, याचाही शासन स्तरावर विचार केला जाईल, असे त्यांनी सांगितले. कोकणातील वणव्यांच्या प्रश्नावर लवकरच विशेष बैठक आयोजित करण्यात येणार असून त्यात वन विभागासोबत कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनाही सहभागी करून व्यापक उपाययोजनांवर चर्चा केली जाणार असल्याची माहितीही मंत्री नाईक यांनी सभागृहात दिली.

यावेळी सदस्य नाना पटोले, सदस्य दीपक केसरकर यांनी उपप्रश्न विचारले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.